निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

दैनिक निशस्त्र योध्दा LIVE

निशस्त्र योध्दा LIVE मराठी
आवाज तुमचा, लढा आमचा !

### दिनविशेष

१५ जून

**अंतरराष्ट्रीय**

२००७ – सलाम फयाद पॅलेस्टिनचे नवीन पंतप्रधान बनले.

**राष्ट्रीय**

१८६९ – महाराष्ट्रातील पहिला विधवा विवाह पार पडला. पांडुरंग विनायक करमरकर यांनी वेणूताईच्या गळ्यात माळ घातली.

**जन्म**

१९३८ – प्रसिद्ध समाजसेवक अण्णा हजारे यांचा जन्म .

**मुख्य संपादक :** सुबोध केशवराव आखाडे

www.epapernishastrayoddha.com TC.NO.MAHMAR/26/A1288 **E-mail :** nishastrayoddha@gmail.com buldhanaupdate.com

**मेहकर** सोमवार । १५ जून २०२६ । वर्ष–पहिले । अंक क्र. ८८ । पृष्ठे–४ । किंमत–४ रू. बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

# माळशिरस येथे पिकप गाडी विहिरीत कोसळून
# ८ जणांचा मृत्यू : ६ गंभीर जखमी

## मृतांच्या वारसांना सरकारकडून ५ लाखांची मदत, मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**सोलापूर :** सोलापूर येथील माळशिरस येथे पिकअप गाडी विहिरीत कोसळून ८ जणांचा, तर ६ जण गंभीर जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. रस्त्याच्या बाजूलाच ही विहीर होती आणि या विहिरीत पिकप गाडी कोसळून यात ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा अपघात घडल्यानंतर आजूबाजूचे लोक जमा झाले असून ही गाडी विहीरीच्या बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. म्हसवड–पंढरपूर मार्गावर तांदुळवाडीजवळ हा भीषण अपघात झाला. या घटेनवर मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे. तसेच या घटनेतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची गोषणा देखील त्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी येथे एक वाहन खाजगी शेतातील विहिरीत पडल्याने झालेल्या अपघातात काही भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. सुदैवाने ७ जणांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. त्यांच्यावर उपचार केले जात आहेत.जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक दोघेही तातडीने घटनास्थळी रवाना झाले आहेत आणि स्थानिक प्रशासनाशी आम्ही सातत्याने संपर्कात आहोत, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

म्हसवड–पंढरपूर मार्गावरून सिद्धनाथांच्या दर्शनासाठी गेलेल्या भाविकांवर काळाने घाला घातला आहे. सिद्धनाथांचं दर्शन करून गावाकडे परताना माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी गावानजीक एका विहिरीत पिकप गाडी कोसळली. गाडी कोसळून भीषण अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मृतांमध्ये महिला, लहान मुलांचा देखील समावेश आहे.

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना म्हटले की, खूपच दुर्दैवी अशी घटना आहे. मी देखील या संदर्भात माहिती घेत आहे. एवढ्या लोकांचा मृत्यू होत आहे आणि त्यातून अजून गोष्टी स्पष्ट झालेल्या नाहीत. पण आम्ही या संदर्भात माहिती घेत आहोत आणि मदत पोहोचवत आहोत.

पुढे बोलताना जयकुमार गोरे म्हणाले, विहीरीची माहिती देखील घेतली जाणार आहे. विहिरीला कठडा आहे की नाही तसेच जर नसेलच तर मग त्यावर कारवाई केली जाईल. रस्त्याच्या बाजूलाच विहीर आहे, तर त्याला कठडा असणे बंधनकारक आहे. पण जर कठडा नसेल तर चौकशी होईल आणि कारवाई होईल. कारवाई करणे हा विषय वेगळा आहे, पण लोकांचा मृत्यू होणे हे अतिशय दुर्दैवी आहे.

माळशिरसचे आमदार उत्तम जाणकार याविषयी बोलताना म्हणाले, माझ्या मतदारसंघात ही घटना घडली आहे. रस्त्याच्या बाजूला ही विहीर आहे. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. मी आता



तिथे निघालो आहे. या अपघातात दोन पुरुष वाचले असल्याची माहिती मला मिळत आहे.

आमदार राम सातपुते म्हणाले, अतिशय दुःखद घटना आहे. विहीर जी आहे ती पंढरपूरपासून जो रोड आहे, त्याच्या जवळच ही विहीर आहे. विहिरीत थेट गाडी जाऊन पडली आहे. या दुःखद प्रसंगी मी या परिवाराच्या बद्दल सहवेदना व्यक्त करतो. विहीरीच्या कठड्याविषयी मी चौकशी करणार असल्याची माहिती देखील सातपुते यांनी दिली आहे.

## Short न्यूज

### खान सरांच्या कोचिंग सेंटरची तोड़फोड करणाऱ्या आरोपीचा हॉटेलमध्ये संशयास्पद मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहारमधील पाटणा येथील सुप्रसिद्ध शिक्षक रोशन आनंद सर आणि खान सर यांच्यातील सुरू असलेला वाद गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या वादामुळे ज्ञानबिंदू कोचिंग सेंटरचे संचालक रोशन आनंद सध्या तुरुंगात आहेत. अनेक दिवसांपासून अटकेच्या धोक्याचा सामना केल्यानंतर खान सरांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. मात्र, या वादाच्या दरम्यान नेपाळमधून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. ज्ञानबिंदू कोचिंग सेंटरचे संचालक रोशन आनंद यांचा भाऊ प्रिन्स याचा नेपाळमध्ये मृत्यू झाला आहे. खान सरांच्या कोचिंग सेंटरवरील हल्ल्यात प्रिन्सवर आरोप होता. खान सरांच्या कोचिंग सेंटरवरील हल्ल्यात प्रिन्स हा देखील एक आरोपी होता. एफआयआर दाखल झाल्यानंतर प्रिन्स आपल्या सहा–सात मित्रांसोबत नेपाळमध्ये राहत होता. काल रात्री उशिरा संशयास्पद परिस्थितीत त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच रोशन आनंद सरांचे कुटुंब नेपाळमध्ये दाखल होत आहे. २०२१ मध्ये खान सरांच्या कोचिंग सेंटरवरील हल्ल्यात प्रिन्सवरही आरोप होता.नेपाळमधील एका हॉटेलमध्ये रोशन आनंद यांचा भाऊ प्रिन्स याचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला आहे. मृत्यूचे कारण अद्याप उघड झालेले नाही. तपास सुरू आहे. स्थानिक पोलिसांनी हॉटेलमध्ये उपस्थित असलेल्या इतर तरुणांना ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरू केली आहे.

### झारखंडमध्ये वीज कोसळून ७ जणांचा मृत्यू, मृतांमध्ये महिला आणि १० वर्षीय मुलाचा समावेश

**रांची/वृत्तसंस्था :** झारखंडमध्ये मान्सूनपूर्व काळात वीज कोसळण्याच्या घटनांमध्ये गेल्या २४ तासांत ७ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन महिला आणि एका १० वर्षीय मुलाचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रांची आणि गरवा जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला असून दोन्ही ठिकाणी दोन जणांचा मृत्यू झाला आहे. रांची जिल्ह्यातील पिथोरिया परिसरातील बरहू गावचे जितू महाली (५५) आणि कटमकुली गावातील निराशा देवी (३३) हे शेतात काम करत असताना त्यांच्यावर वीज कोसळली. या दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. दरम्यान, गरवा जिल्ह्यातील सुंडी गावातील रीना देवी (३०) आणि मुकुंदपूर गावातील राम अवतार पाल (६५) यांचाही वीज पडून मृत्यू झाला. याशिवाय छत्रा, गिरिडीह आणि सेराईकेला–खरसावन जिल्ह्यांमध्ये झालेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये आणखी तीन जणांचा जीव गेला. झारखंडमध्ये सध्या हवामानातील बदलांमुळे वीज पडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

### जेएनपीटी परिसरात भीषण स्फोट; दोन कामगारांचा मृत्यू

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**रायगड :** जेएनपीटी परिसरातील जेएसडब्ल्यू ऑइल जेट्टीवर रविवारी सकाळी झालेल्या भीषण स्फोटात दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तेलवाहिनी पिगिंगचे काम सुरू असताना हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.या दुर्घटनेत करावली (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) येथील राजेंद्र शिंदे आणि उरण तालुक्यातील पिरकोन येथील गजानन गावंड यांचा जागीच मृत्यू झाला. सकाळी सुमारे ९ वाजता जेट्टी परिसरात काम सुरू असताना अचानक स्फोट झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. घटनेनंतर दोन्ही मृतदेह उरण येथील इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा व प्राथमिक तपास सुरू केला आहे. तसेच जेएनपीटी प्रशासनाकडूनही स्वतंत्र चौकशी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.दरम्यान, पिगिंगसारख्या धोकादायक कामादरम्यान सुरक्षा नियमांचे पालन झाले का, याबाबत कामगार संघटना आणि स्थानिक नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. हेल्मेट, गॅस टेस्टिंग आणि 'परमिट टू वर्क' प्रक्रियेचे पालन झाले नसल्याचा आरोपही काही संघटनांकडून करण्यात येत आहे.या घटनेनंतर जेट्टीवरील कामकाज तात्पुरते थांबविण्यात आले असून, दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## भरधाव क्रेटाची क्रूझरला पाठीमागून जोरदार धडक; तीन महिलांचा मृत्यू, ११ जण जखमी

### तुळजापूर–नागपूर महामार्गावर बुधोडाजवळ भीषण अपघात

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**औसा :** तुळजापूर–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील औसा तालुक्यातील बुधोडा परिसरात रविवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर ११ जण जखमी झाले. भरधाव वेगाने येणाऱ्या क्रेटा कारने पुढे जात असलेल्या क्रूझर जीपला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, उमरगा येथील भाविक देवदर्शनासाठी बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे क्रूझर जीपने निघाले होते. रविवारी पहाटे सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास ते औसा येथून लातूरकडे जात असताना बुधोडा गावाजवळील हॉटेल द्वारकाच्या पुढे आले. त्यावेळी मागून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच–२४–एडब्ल्यू–३६९१ क्रमांकाच्या क्रेटा कारच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत पुढील एमएच–१२–सीआर–८०७७ क्रमांकाच्या क्रूझर जीपला पाठीमागून जोरदार धडक दिली.



धडक इतकी भीषण होती की क्रूझर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. जीप प्रथम रस्त्यालगतच्या विजेच्या खांबाला धडकली आणि त्यानंतर पलटी होत रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन पडली. अपघातानंतर वाहनांतील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. या अपघातात निलावती आनंदराव पाटील, सरोजा सुरेश पतंगे आणि रेश्मा गंगाधर पाटील (सर्व रा. नवी पेठ, उमरगा, जि. धाराशिव) यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातात लक्ष्मण शिवानंद मसरे, दीपाली कन्हैया स्वामी, शितल प्रवीण देशमुख, सुचिता सचिन देशमुख, कल्पना नितीन देशमुख, कन्हैया नागय्या स्वामी, गंगाधर आनंदराव काटे, वीरेश गंगाधर पाटील, विघ्नेश्र्वर गंगाधर पाटील, मानसी लक्ष्मण कोलंगे आणि भक्ती देशमुख हे जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तातडीने लातूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलिस आणि आपत्कालीन यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. पोलिसांनी पंचनामा करून अपघाताची नोंद केली आहे. जखमी लक्ष्मण शिवानंद मसरे यांच्या फिर्यादीवरून क्रेटा कारचा चालक आदित्य श्रीहरी भताने (रा. लातूर) याच्याविरुद्ध औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की क्रूझर जीपचा अक्षरशः चक्काचूर झाला. वाहनातील प्रवाशांच्या चपला, कपडे, पिशव्या तसेच पूजेचे साहित्य घटनास्थळी विखुरलेले दिसत होते.

या भीषण अपघाताची वार्ता बुधोडा परिसरात पसरताच अपघातस्थळी दिवसभर नागरिकांची गर्दी झाली होती. देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाने घाला घातल्याने घटनास्थळी उपस्थित प्रत्येकजण हळहळ व्यक्त करत होता. या दुर्घटनेमुळे मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## बुलढाण्यात गुटखा तस्करीचा पर्दाफाश! नाकाबंदीत ७० लाखांचा मुद्देमाल जप्त

### ५० लाखांचा अवैध गुटखा जप्त; ट्रकचालकाला अटक

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**बुलढाणा :** मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूरकडून आलेला एक संशयास्पद ट्रक नाकाबंदीद्वारे अडवून पोलिसांनी ट्रकमधील सुमारे ५० लाख १३ हजार रूपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा मोठा साठा जप्त केला.

या कारवाईत २० लाखांचा ट्रकही जप्त केला असून आरोपी ट्रकचालकाला अटक करण्यात आली आहे. सुरूर अहमद नुर अहमद (रा. फिरदोस कॉलनी अकोला) असे अटक करण्यात आलेल्या ट्रकचालकाचे नाव आहे. हा अवैध गुटखा अकोला मार्गाने पुढे नेला जाणार असल्याची माहिती चालकाच्या प्राथमिक चौकशीतून समोर आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, १३ जूनच्या रात्री ९.३० च्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांचे पथक गस्तीवर असतांना त्यांना मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर मार्गाकडून बुलढाणा जिल्ह्यात जळगाव जामोद परिसरात आलेल्या एका ट्रकमधून अवैध गुटख्याची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वरवंट बकाल ते शेगाव मार्गावर एका बेकरीजवळ नाकाबंदी केली. दरम्यान, रात्री १० च्या सुमारास संशयित ट्रक (क्र.एमएच – ४० जीटी ५९६५) हा ट्रक अडवून झाडाझडती घेतली असता विविध कंपन्यांचा अवैध गुटखा,पानमसाला व सुगंधित तंबाखू असा एकूण ५० लाख १३ हजार ९२० रूपये किंमतीचा प्रतिबंधित मालाचा मोठा साठा आढळून आला. गुटख्याच्या अवैध वाहतुकीसाठी वापरलेला २० लाखांचा ट्रकही या कारवाईत जप्त करण्यात आला. पोलिस अधिक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील, उपनिरीक्षक सुनिल राऊत, पोहेका सुधाकर थोरात,योगेश कुंवारे, मंगेश सोळंके यांच्या पथकाने ही कारवाई केली. शेगाव पोलिस याप्रकरणी पुढील तपास करीत आहेत.

## मुख्यमंत्री विद्यार्थ्यांच्या स्वागताला, देवेंद्र फडणवीस अन् सुनेत्रा पवारांची 'शाळा' ठरली; एकनाथ शिंदेंनी सायकल वाटल्या

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**मुंबई :** उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर उद्या १५ जूनपासून राज्यातील सर्वच शाळा सुरू होत असून गावागावात शाळेची घंटा वाजणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शाळेत हजर राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पहिल्या दिवशी शाळेत जाऊन करणार विद्यार्थ्यांचे स्वागत करुन त्यांच्याशी संवादही साधणार आहेत. पनवेलच्या वहाळ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मुख्यमंत्री फडणवीस विद्यार्थ्यांसोबत आपला वेळ घालवणार आहेत. तर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ह्या मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हे येथे हजेरी लावणार आहेत. उपमुख्यमंत्री



एकनाथ शिंदेंनी विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप केले आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री रायगड जिल्ह्यात तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पुणे जिल्ह्यातील शाळेत हजर राहतील. मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हे येथे १५ जून रोजी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पीएम श्री योजनेअंतर्गत विकसित होत असलेली ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक शैक्षणिक सुविधा, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि सर्वांगीण विकासासाठी विशेष ओळख निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत आवड निर्माण करणे, शाळेप्रती आपुलकी वाढविणे आणि प्रत्येक बालकाचा शाळेत आनंददायी प्रवेश सुनिश्चित करणे हा या प्रवेशोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. कार्यक्रमामध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात येणार असून, त्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांकडून स्वागतगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. सुनेत्रा पवार विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांशी संवाद साधून गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शासनाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दरे गावातील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर आज ते मुंबईकडे रवाना झाले.जाण्यापूर्वी १०५ गावातील दुर्गम भागात असणाऱ्या पाचवी ते दहावीचे शिक्षण घेणाऱ्या पहिल्या टप्प्यातील २५० विद्यार्थ्यांना मोफत सायकली वाटप करून मुलांनी शिक्षणामध्ये गावाचे नाव उज्वल करावे, असा मौलिक सल्ला दिला आहे. सायकल हाती मिळताच मुलांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळाले. या दुर्गम कांदाटी आणि कोयना विभागातील विद्यार्थ्यांसाठी पावसाळ्यातच नव्हे तर संपूर्ण वर्षभर शाळेसाठी पायी प्रवास करताना खूप यातना सहन कराव्या लागतात.हा सर्व प्रकार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ १०५ गावातील विद्यार्थ्यांना सायकल वाटपचा निर्णय घेतला आणि या पहिल्या टप्प्यातील २५० सायकलींचे वाटप आज करण्यात आले.

### क्वांटम सुरक्षा धोरणात्मक गरज...

डिजिटल क्रांती झपाट्याने स्वीकारून आपण भारतीय वेगाने पुढे जात आहोत. हा हा म्हणता सगळ्या आर्थिक स्तरावरील मंडळींसाठी स्मार्टफोन ही जीवनावश्यक वस्तू बनली. त्यासोबत वापरायचे तऱ्हेतऱ्हेचे गॅजेट्स, ॲप्स, डाऊनलोडिंग, शेअरिंग, अपडेट्स असे अनेक परवलीचे शब्द तयार झाले आणि जनसामान्यांच्या तोंडात स्थानापन्न झाले. सोबतच ई-बँकिंग, ऑनलाईन शॉपिंग, ई-कॉमर्स अशा सगळ्या नवनवीन गोष्टी 'सोय' म्हणून वापरू लागलो आणि त्याची सवय अंगवळणी पडली. दुसरीकडे, सोशल मीडियावर मनोरंजन म्हणून, रील बनवून कमाई करणाऱ्यांची फौज उभी झाली आहे. शिवाय, स्मार्टफोनला मागे टाकून विअरेबल म्हणजे अंगावर घालण्याजोगे डिव्हाईसेस जेन झीची पसंत बनते आहे. सगळं खूप फटाफट घडतंय आणि त्यावर सध्या तरी आक्षेप घेण्यासारखं काही वाटत नाही. पण, या वेगाच्या दुसऱ्या बाजूचा 'वेध' घेऊ या. भारतीयांची अशी सगळी कामे झटपट होत असताना, त्या सर्व्हरवर कुठेतरी, कदाचित भारताच्या सीमांपलीकडे, एखाद्या देशाने तयार केलेली गुप्तयंत्रणा शांतपणे ही सगळी माहिती अर्काईव्ह करत असेल तर... आज हे सगळे पासवर्ड्स, ओटीपी, फोटो-व्हिडीओज्, खाजगी संभाषण, सीसीटीव्ही फूटेज वगैरे 'एन्ड टू एन्ड एन्क्रिप्टेड' दिसत असले तरी ते जगाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात ते जसेच्या तसेच जपून ठेवले जात आहेत. यासाठी जगभरातील देश काम करत असले तरी चीन त्यात अग्रेसर आहे. आपली इस्रोदेखील क्वांटम जगभरात ५१८ कंपनीज् यासाठी काम करत असून त्यापैकी ४१४ कंपनीज् चीनच्या आहेत. त्यातही, या कामासाठी 'सॉल्ट टायफून' ही चीन सरकारची अधिकृत एजन्सी मानली जाते. ऑक्टोबर २०२४ मध्ये 'सॉल्ट टायफून'चे काम जगापुढे आले होते. माहितीचा हा प्रचंड साठा कशासाठी एकत्र केला जातोय? या प्रश्नाचे उत्तर 'क्यू डे'च्या संकल्पनेत आहे. क्वांटम कंप्युटर्स म्हणजे अफाट क्षमतेचे भावी अत्याधुनिक हार्डवेअर जे नजीकच्या भविष्यात या संपूर्ण माहितीवर प्रक्रिया करून, ती खुली करू शकतील. आजच्या कॉम्प्युटर्सचे काम बिट्सवर चालते तसे, क्वांटम कॉम्प्युटर्स क्विबिट्सवर काम करतील. उदाहरणार्थ, आजपर्यंत उपलब्ध असलेला डेटा एन्क्रिप्ट करण्यासाठी सध्याच्या वेगवान कॉम्प्युटर्सना १०० वर्षांवर कालावधी लागू शकतो. हेच काम क्वांटम कॉम्प्युटर ८ ते १० वर्षांमध्ये पूर्ण करू शकेल. हे ज्या दिवशी होईल तो दिवस असेल क्यू डे! रेल्वे-विमान यंत्रणांपासून बँकांपर्यंत, शेअर बाजारापासून आधार कार्डच्या बायोमेट्रिक डेटापर्यंत, टपाल खात्यांपासून माध्यमांपर्यंत इंटरनेटशी संबंधित व्यवस्था कोलमडेल. संरक्षण खात्याची माहिती, अण्वस्त्रांचे पासवर्डस्ही डिकोड होतील. जगाच्या कानाकोप्यातील सीसीटीव्ही प्रत्येकाची दैनंदिनी चव्हाट्यावर आणतील. यालाच म्हणतात एचएनडीएल म्हणजे हार्वेस्ट नाऊ, डिक्रीप्ट लेटर! म्हणजेच, आज मिळेल तेवढी माहिती संग्रहित करून ठेवा आणि क्वांटम कॉम्प्युटर्स कार्यान्वित होताच, माहिती डिक्रिप्ट करा. ग्लोबल रिस्क इन्स्टिट्यूटच्या ३२ क्वांटम संशोधकांच्या मते, २०३३ ते २०३७ दरम्यान, या सगळ्या प्रक्रिया पूर्ण होऊन, कोणत्याही देशावर असा क्यू डे हल्ला होऊ शकेल. रक्ताचा एक थेंबही न सांडता, एखाद्या राष्ट्राला नेस्तनाबूत करता येईल. या सगळ्यात प्रशासकीय यंत्रणेतील मोठा डेटा हल्लेखोरांच्या हाती लागू शकतो. याचे प्रात्यक्षिक रशिया-युक्रेन आणि इस्रायल-इराण युद्धाच्या वेळी आपण बघितले आहेत. प्रत्यक्ष हल्ला करण्यापूर्वी युक्रेन आणि इराणवर सायबर हल्लेच करण्यात आले होते. हा धोका ओळखून भारत सरकारने विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाला, राष्ट्रीय क्वांटम मिशन या आगामी ८ वर्षांसाठीचा दूरदर्शी उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी ६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. आगामी क्वांटम युगाची पावले नेमकी ओळखून घेतलेल्या या निर्णयामुळे क्वांटम सुरक्षा ही शक्यता नाही तर धोरणात्मक गरज आहे आणि गेल्या ३० वर्षांत सायबर सुरक्षेच्या क्षेत्रातील हा एकमेव सर्वांत मोठा बदल आहे. भविष्यातील हल्ल्यांपासून सुरक्षा महत्त्वाची असली तरी आजच आपला डेटा सुरक्षित ठेवणे जास्त महत्त्वाचे आहे. भारत सरकारच्या प्रयत्नांमध्ये नागरिकांचा खारीचा वाटा असायलाच हवा. डिजिटल देवाणघेवाण करण्यासाठी स्वतंत्र बँक खात्याचा वापर करायला हवा. आर्थिक व्यवहार शक्यतो प्रत्यक्षात करावे. खाजगी फोटो-संभाषण, महत्त्वाचे दस्तावेज सोशल मीडियावर शेअर करताना टायमर लावण्यासारखी काळजी घ्यावी. देशभरातील आयआयटीज्मध्ये क्वांटम सिक्युरिटी या विषयावर लहानमोठे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते करून या क्षेत्रात करीयर घडविण्याच्याही संधी आहेत. संकटाचे रूपांतर संधीत कसे करायचे? हे आपण भारतीय जाणतोच. 'क्यू डे'साठी तयारी करण्याची हीच ती वेळ आहे.

# ममता बॅनर्जींच्या अडचणीत वाढ

## तृणमूलमधील २२ खासदारांचे संख्याबळ असल्याचा बंडखोर नेत्या काकोलींचा दावा

**नवी दिल्ली/कोलकाता :** तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) खासदार काकोली घोष दस्तीदार यांनी दावा केला आहे की, त्यांना पक्षातील २८ पैकी २२ खासदारांचा पाठिंबा मिळाला आहे. यापूर्वी ममता बॅनर्जी यांच्या जवळच्या लोकांनी घोष यांनी सांगितलेला आकडा चुकीचा असल्याचा दावा केला होता. मात्र, रविवारी घोष यांनी स्पष्ट केलं की, त्यांच्याकडं पुरेसे संख्याबळ असून त्या सोमवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेणार आहेत. स्वतंत्र संसदीय गट म्हणून मान्यता मिळावी, यासाठी त्या अध्यक्षांकडं अपील करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

घोष म्हणाल्या, आम्ही बैठकीसाठी दिल्लीला जात आहोत. आमच्यासोबत २२ खासदार आहेत. अध्यक्षांनी आम्हाला वेळ दिला आहे. सोमवारी आम्ही त्यांची भेट घेऊन स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याची मागणी करू.'' त्यांनी आणखी दोन खासदारांची नावे जाहीर करण्यास नकार दिला. संबंधित खासदार औपचारिकरित्या गटात सहभागी झाल्यानंतर त्यांची नावे जाहीर करण्यात येतील, असं त्यांनी स्पष्ट केलं. त्या पुढे म्हणाल्या, ''गेल्या चार-पाच वर्षांपासून पश्चिम बंगालमधील परिस्थितीविरोधात प्रामाणिकपणे आपली मते मांडणारे अनेक जण आमच्या संपर्कात आहेत. आता आमची संख्या २२ झाली आहे.

बंडखोर गटातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मूळतः कोलकाता येथे होणारी बैठक आता दिल्लीत होणार आहे. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, दिघा-शंकरपूर विकास प्राधिकरणाच्या अधिकृत कामामुळं ते दिल्लीत येण्याची शक्यता कमी असल्याचं सांगण्यात आलं आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांनंतर टीएमसीमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा नवा दावा समोर आला आहे. पक्षाच्या लोकसभा खासदारांमधील मतभेद या आठवड्याच्या सुरुवातीलाच स्पष्ट झाले होते. काही बंडखोर खासदारांनी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वापासून स्वतःला जाहीरपणे दूर केले.



१९ टीएमसी खासदारांच्या स्वाक्षऱ्या असलेले पत्र : यापूर्वी, काकोली घोष दस्तीदार यांनी त्यांना सुमारे २० टीएमसी खासदारांचा पाठिंबा असल्याचा दावा केला होता. तसेच, केंद्रातील भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) पाठिंबा देण्याची गटाची तयारी असल्याचेही त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान, शुक्रवारी १९ टीएमसी खासदारांच्या स्वाक्षऱ्या असलेले एक पत्र समोर आले. स्वाक्षरी करणाऱ्यांमध्ये घोष दस्तीदार, शताब्दी रॉय, बापी हलदर, शर्मिला सरकार, प्रसून बॅनर्जी, जगदीश चंद्र बर्मा बसुनिया, असित मल, अरुप चक्रवर्ती, कालीपदा सोरेन, दीपक अधिकारी (देव), जून मालिया, पार्थ भौमिक, खलीकुर रहमान, माला ताहीर खान, अबू ताहीर खान, अबू ताहीर खान आणि युवुफ खान यांचा समावेश होता.

घोष आणि माला रॉय दिल्लीत दाखल : खासदार सायनी घोष आणि माला रॉय रविवारी दिल्लीत दाखल झाल्या. दिल्ली विमानतळावर माध्यमांशी बोलण्यास दोघींनीही नकार दिला. सायनी घोष म्हणाल्या, मी माझ्या मतदारसंघातील जनतेला उत्तरदायी आहे, तुम्हाला नाही.

अमित शाह आणि भूपेंद्र यादव भेट : या घडामोडीच्या एक दिवस आधी, टीएमसीचे ज्येष्ठ नेते आणि खासदार सुदीप बंडोपाध्याय यांनी दिल्लीत केंद्रीय मंत्री अमित शाह आणि भूपेंद्र यादव यांची भेट घेतल्यानंतर बंडखोर गटात प्रवेश केला. या गटानं केंद्रातील एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय आधीच घेतला होता. पक्षांतर्गत सुरू असलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर, शनिवारी नवी दिल्लीत ज्येष्ठ टीएमसी खासदार सुदीप बंडोपाध्याय आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्यात झालेल्या भेटीमुळं नव्या राजकीय चर्चांना सुरुवात झाली आहे. यामुळं, स्वतंत्र संसदीय गट म्हणून मान्यता मिळवू पाहणाऱ्या बंडखोर गटात हे ज्येष्ठ खासदार सामील होतील का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्या टीएमसी खासदारांच्या सह्या या दस्तऐवजावर नव्हत्या, त्यात अभिषेक बॅनर्जी, कल्याण बॅनर्जी, सौगत रॉय, महुआ मोईत्रा, कीर्ती आझाद, शत्रुघ्न सिन्हा, प्रतिमा मंडल आणि सजदा अहमद यांचा समावेश होता.

# ठाण्यात अवैध 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल' साठ्यावर धाड; १.२० कोटींचा मुद्देमाल जप्त

### नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य दक्षता पथकाची कारवाई; तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**ठाणे :** अंबरनाथ तालुक्यात उसाटणे परिसरात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'च्या मोठ्या साठ्यावर राज्य दक्षता पथकाने रविवारी धडक कारवाई करत सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अवैध इंधन साठवणूक आणि काळाबाजाराविरोधातील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे.

नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे (भा.प्र.से.) यांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे राज्य दक्षता पथकाने अंबरनाथ येथील उसाटणे भागातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क परिसरात, राज्यस्तरीय प्लॉट क्रमांक २० समोर छापा टाकला. कारवाईदरम्यान टँकरचे सील तोडून 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'ची बेकायदेशीर साठवणूक व देवाणघेवाण सुरू असल्याचे उघडकीस आले. दोन व्यक्ती या प्रकारात प्रत्यक्ष सहभागी असल्याचे आढळून आले.



पथकाने घटनास्थळी तपासणी केली असता GJ-12 BY-7560 क्रमांकाचा टँकर पूर्णपणे भरलेला आढळला. या टँकरमध्ये सुमारे २९ हजार ७०० किलो मिक्स हायड्रोकार्बन ऑईल असल्याचे निदर्शनास आले. तसेच MH-43 E-190 क्रमांकाचा आणखी एक टँकर घटनास्थळी उभा असून त्यामध्ये इलेक्ट्रिक मोटारीच्या सहाय्याने इंधन साठवण्याचे काम सुरू असल्याचे आढळले. याशिवाय MH-46 C-1282 क्रमांकाच्या टेम्पोमध्ये २०० लिटर क्षमतेच्या प्लास्टिक बॅरलमध्ये तेलाची बेकायदेशीर साठवणूक सुरू होती. या वाहनात २२० लिटर क्षमतेचे २० रिकामे प्लास्टिक बॅरल्स देखील आढळून आले.

घटनास्थळी जमिनीवर आणखी ८० रिकामे बॅरल्स, एक इलेक्ट्रिक मोटार आणि एक एअर ऑपरेटेड डायफ्राम (AOD) पंप जप्त करण्यात आला. या सर्व साहित्य, वाहने आणि इंधनासह एकूण सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संबंधितांकडे आवश्यक परवाने किंवा वैध कागदपत्रे नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून, संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच अवैध इंधन साठवणूक, वाहतूक आणि काळाबाजाराशी संबंधित इतर बाबींचाही तपास केला जाणार आहे.

ही कारवाई नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य दक्षता पथकाचे सहायक नियंत्रक शिधावाटप प्रदीप काळे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले, मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे तसेच शिधावाटप निरीक्षक रामराजे भोसले, चंद्रकांत कांबळे, विकास नागदिवे, रवींद्र राठोड, राजेश सोरते, देवानंद थोरवे, पवन कुंभले, राहुल इंगळे आणि अरुण काते यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. दरम्यान, इंधनाच्या अवैध साठवणुकीमुळे महसूल नुकसान होण्याबरोबरच सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या बेकायदेशीर साठवणूक, वाहतूक आणि काळाबाजाराविरोधातील मोहिमा आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येतील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### ओमानमधील दुकम बंदरावर भारतीय नाविकाचा मृत्यू, दोन दिवस मृतदेह जहाजावरच पडून

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ओमानमधील दुकम बंदरावर उभ्या असलेल्या 'एमटी सेलेस्टियल' या जहाजावरील एका भारतीय नाविकाचा मृत्यू झाला आहे. मयत भारतीय नाविकाचा मृतदेह भारतात आणण्यासाठी भारतीय दूतावास प्रयत्न करत आहे. मृत्यू झालेल्या ३५ वर्षीय भारतीय नाविकाचे नाव निशांत उइर्थनाथन असे आहे. तो 'एमटी सेलेस्टियल' जहाजावर काम करणारा तामिळनाडूचा दुसरा अधिकारी होता.

मस्कट येथील भारतीय दूतावासाने शनिवारी 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, प्रकृती खालावल्याने तसेच आरोग्याशी संबंधित समस्या निर्माण झाल्याने उइर्थनाथन यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी भारतीय दूतावास त्यांचा मृतदेह भारतात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. शिपिंग कंपनी व संबंधित सर्व यंत्रणांच्या संपर्कात भारतीय दूतावास आहे. लवकरात लवकर उइर्थनाथन यांचे पार्थिव त्यांच्या घरी पोहोचवण्यासाठी काम केले जात आहे, असे मस्कत येथील भारतीय दूतावासाने म्हटले आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे समुद्रात काम करणाऱ्या भारतीय नाविकांच्या आरोग्य सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भारतीय नाविकांना समुद्रात काम करताना मर्यादित आरोग्य सुविधा पुरवल्या जातात. 'फॉरवर्ड सिमेन्स यूनियन ऑफ इंडिया' ने दिलेल्या माहितीनुसार, उइर्थनाथन यांची प्रकृती ८ जून रोजी अत्यंत खालावली होती. ११ जून रोजी संध्याकाळी सहा वाजता त्यांचे निधन झाले. उइर्थनाथन यांना वैद्यकीय उपचार पुरवण्यात तसेच त्यांचा मृतदेह जहाजाबाहेर काढण्यात विलंब झाला. मृत्यूनंतरही त्यांचे पार्थिव दोन दिवस जहाजावरच होते.

# शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव : 'शाळा प्रवेशोत्सव'

राज्यातील सर्व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे तसेच शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे या उद्देशाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्यावतीने 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात केल्यास त्यांचा उत्साह द्विगुणित होईल आणि शैक्षणिक वर्षाची सुरूवात अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात होईल. यासाठी विदर्भातील शाळा वगळता उर्वरित महाराष्ट्रात यंदाचा 'शाळा प्रवेशोत्सव' १५ जून २०२६ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. या पार्श्वभूमीवर शाळा प्रवेशोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, पालकांचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सवासाठी व्यापक नियोजन केले असून राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी राज्यभरातील विविध शाळांना भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.

मागील वर्षी राबविण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवामुळे शाळांमधील पटसंख्येतील घट कमी होण्यास मदत झाली. काही जिल्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत पटसंख्येत वाढही दिसून आली. या सकारात्मक परिणामांच्या आधारे यंदा अधिक व्यापक आणि परिणामकारक पद्धतीने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत प्रत्येक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे. 'पहिले पाऊल' या संकल्पनेअंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना दिली जाणार आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण करण्यात येणार असून शाळेचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा केला जाणार आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची सक्रिय भूमिका निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याने किमान एका शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करायचे असून संबंधित अधिकाऱ्यांनी शाळा वर्षभरासाठी 'दत्तक शाळा' म्हणून स्वीकारून तेथील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यायचा आहे. यामुळे शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी परिसरातील अंगणवाडी व बालवाडी केंद्रांना भेट देऊन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी, पालकांशी संवाद साधावा आणि शासकीय शाळांमधील विविध सुविधा, शिष्यवृत्ती, नाविन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. समाजमाध्यमे, ग्रामस्तरीय जनजागृती, दवंडी आणि पालकांच्या व्हॉट्सॲप गटांद्वारेही शाळा सुरू होण्याबाबत व्यापक प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे.

यंदाच्या प्रवेशोत्सवासाठी जिल्हास्तरावर विशेष नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली असून 'शाळा प्रवेशोत्सव कक्ष' स्थापन करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाणार आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या शाळा भेटींची माहिती, छायाचित्रे आणि अहवाल ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदविले जाणार आहेत.

शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो. शाळा प्रवेशोत्सव २०२६ हा उपक्रम विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते अधिक दृढ करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण, वाढती उपस्थिती आणि सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शासन, प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांच्या संयुक्त सहभागातून प्रत्येक बालक शिक्षणाच्या प्रवाहात यावे, हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू असून त्याद्वारे 'शिक्षणसमृद्ध महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने आणखी एक सकारात्मक पाऊल टाकले जात आहे.

**ब्रिजकिशोर झंवर**
**विभागीय संपर्क अधिकारी**

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ॲक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

# मलकापूर आगाराच्या चालक-वाहकाची उत्कृष्ट कामगिरी; अपेक्षेपेक्षा अधिक उत्पन्न मिळवत निर्माण केला आदर्श



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मलकापूर आगारातील चालक व वाहकाने कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिक सेवा आणि प्रवासीभिमुख कार्याचा आदर्श निर्माण केला आहे. कर्तव्य क्र. २२ अंतर्गत मलकापूर ते धुळे मार्गावर सेवा बजावणारे चालक अविनाश मालठाणे व वाहक ललित बाठे यांनी अपेक्षित उत्पन्नापेक्षा अधिक उत्पन्न मिळवत आगाराच्या उत्पन्नवाढीत मोलाचे योगदान दिले.

दि. १३ जून २०२६ रोजीच्या प्रवासात या बसफेरीसाठी १३ हजार ४७५ रुपये अपेक्षित उत्पन्न निश्चित करण्यात आले होते. मात्र चालक मालठाणे व वाहक बाठे यांच्या नियोजनबद्ध कामगिरीमुळे या फेरीत तब्बल १९ हजार ४१० रुपये उत्पन्न मिळाले. जवळपास सहा हजार रुपयांहून अधिक अतिरिक्त उत्पन्न मिळवत त्यांनी आपली कार्यतत्परता सिद्ध केली आहे.

मागील पंधरा वर्षांपासून मलकापूर आगारात सेवा देणारे चालक अविनाश मालठाणे व वाहक ललित बाठे हे प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वागणूक, सहकार्य वृत्ती, सुरक्षित प्रवास आणि प्रामाणिक सेवेसाठी ओळखले जातात. प्रवाशांचा विश्र्वास संपादन करत त्यांनी एसटीच्या सेवेला अधिक बळकट करण्याचे काम केले आहे.

आजच्या महागाईच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित, आरामदायी आणि किफायतशीर प्रवास उपलब्ध करून देण्यात एसटी महामंडळाची भूमिका महत्त्वाची आहे. महामंडळाच्या विविध प्रवासी योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवतानाच उत्पन्न वाढीसाठी कर्मचारीही प्रयत्नशील आहेत. याचाच आदर्श चालक मालठाणे व वाहक बाठे यांच्या कामगिरीतून दिसून येतो. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल मलकापूर आगारातून तसेच प्रवासी वर्गातून त्यांचे कौतुक होत असून, इतर कर्मचाऱ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरत आहे.

# २४ तासांत दुसरा डल्ला; देवीचा मुकुट पुन्हा चोरीला, चोरट्याचं पोलिसांना खुलं आव्हान?




निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे येथील तुळजाभवानी देवी मंदिरातील चांदीच्या मुकुट चोरीच्या प्रकरणाने नवे वळण घेतलं आहे. विशेष म्हणजे, पोलिसांनी चोरीचा उलगडा करून आरोपीला अटक केली. मुकुट जप्त करून मंदिरात परत आणला. त्यानंतर अवघ्या २४ तासांत तोच मुकुट पुन्हा चोरीला गेल्यानं खळबळ उडाली आहे.

तळेगावातील तुळजाभवानी देवी मंदिर हे भाविकांच्या श्रद्धेचे प्रमुख केंद्र मानलं जातं. २३ मे रोजी एका चोरट्यानं मंदिरात प्रवेश करून देवीच्या मस्तकावरील सुमारे दीड लाख रुपये किमतीचा चांदीचा मुकुट चोरून नेला होता. ही संपूर्ण घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. त्यामुळे पोलिसांनी या गुन्ह्याचा गंभीरपणे तपास सुरू केला. काही दिवसानंतर आरोपीला अटक करून चोरीला गेलेला मुकुट हस्तगत केला. या कारवाईनंतर पोलिसांनी यशस्वी तपास केल्याबद्दल समाधान व्यक्त केले होते.

त्यानंतर १२ जून रोजी पोलीस अधिकारी, मंदिर प्रशासन आणि भाविकांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात देवीचा मुकुट पुन्हा तिच्या मस्तकी विराजमान करण्यात आला. त्यामुळे चोरीचे प्रकरण संपल्याचं आणि मंदिरातील व्यवस्था पूर्ववत झाल्याचं सर्वांना वाटत होते. घटनेनंतर अवघ्या २४ तासांतच चोरट्यानं पुन्हा डाव साधला. मंदिरातील तोच चांदीचा मुकुट पुन्हा चोरीला गेला. त्यामुळे मंदिर प्रशासन, भाविक आणि पोलीस यांच्यात एकच खळबळ उडाली आहे.

एकदा चोरी, आरोपी अटक, मुकुट जप्त आणि पुन्हा चोरी असा संपूर्ण घटनाक्रम घडल्यानं अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक नागरिक आणि भाविकांमध्येही या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे. काहींनी याला पोलिसांच्या कार्यक्षमतेला दिलेले थेट आव्हान असे म्हटलं आहे. कारण, नुकतेच पोलिसांनी आरोपीला अटक करून मुकुट परत मिळवल्याचा दावा केला होता. मात्र, त्याच मुकुटाची पुन्हा चोरी झाल्यानं सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

# केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध विकासकामांचा आढावा

## केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती




निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध विकासकामे, जनकल्याणकारी योजना आणि देशाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आज बुलढाण्यात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पत्रकार परिषदेला राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर तसेच संजय गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार परिषदेनंतर मान्यवरांच्या हस्ते अधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या १२ वर्षांच्या कारकिर्दीतील विविध निर्णय आणि योजनांचा आढावा घेण्यात आला. देशाची अर्थव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा, डिजिटल व्यवहार व्यवस्था आणि जनकल्याणकारी योजनांमध्ये झालेल्या प्रगतीवर प्रकाश टाकण्यात आला. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करणे, सर्जिकल स्ट्राइक, बालाकोट एअर स्ट्राइक यांसारख्या राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित निर्णयांचा उल्लेख करण्यात आला.

डिजिटल व्यवहार क्षेत्रात युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (णझख) प्रणालीने देशाच्या अर्थव्यवस्थेला नवे बळ दिल्याचे सांगण्यात आले. तसेच अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्र्वनाथ कॉरिडॉर, महाकाल आणि केदारनाथ पुनर्विकास प्रकल्पांद्वारे सांस्कृतिक वारसा संवर्धनालाही चालना मिळाल्याचे नमूद करण्यात आले.

बुलढाणा जिल्ह्यासाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा आढावा घेताना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत जिल्ह्यात १० लाख ५० हजारांहून अधिक आयुष्मान कार्डांचे वितरण झाल्याची माहिती देण्यात आली. खामगाव-जालना रेल्वे मार्गाच्या प्रकल्पाला अंतिम मंजुरी प्रक्रियेत महत्त्वपूर्ण प्रगती झाल्याचेही सांगण्यात आले. या मार्गासाठी भूमी अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू असून त्याबाबतचे राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे.

शेतकरी कल्याणासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान योजनांद्वारे वार्षिक १२ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत २०२२ ते २०२६ या कालावधीत बुलढाणा जिल्ह्यातील १३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना १४०८.८९ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

केंद्र सरकार गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उन्नतीसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असून विकासाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून जनतेपर्यंत लाभ पोहोचविण्यास कटिबद्ध असल्याचा विश्र्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

# विवरा येथील अवैध देशी दारू व वरली मटका बंद करण्यासाठी महिलांचा ऐल्गार

## पाच दिवसात गावातील अवैध धंदे बंद न केल्यास दसरखेड एमआयडीसी पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषणाचा महिलांचा पोलीस निरीक्षकांना इशारा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**मलकापुर:** तालुक्यातील विवरा गावामध्ये देशी दारू व वरली मटका राजरोसपणे सुरू असून अनेक वेळा लेखी व तोंडी स्वरूपात तक्रारी करून सुद्धा गावातील देशी दारू, वरली मटका बंद झाला नाही, देशी दारूमुळे अनेक संसार उधवस्त झाले आमच्या गावांमध्ये ७० टक्के तरुण दारूच्या व्यसनाधीन झाले त्यात काही तरुणांचा मृत्यू तर काहींच्या किडन्या, लिव्हर फेल झाला आहे काही तरुण दवाखान्यामध्ये उपचार घेत आहेत, गावातील वासुदेव तायडे व उषाबाई बोरले हे देशी दारूचा धंदा करतात त्यांच्याकडे गावातील प्रतिष्ठित समजावून सांगण्यासाठी गेले असता ते उद्धट भाषेत उत्तर देतात की आम्ही पोलिसांना हप्ते देतो... आमचं कोणीही काही वाटलं करू शकत नाही तरी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. देशी दारू व वरली मटका बंद करण्यात यावा आणि जो कोणी त्यांना देशी दारू गावात पोच करतो त्याची गाडी पेटवून त्याला सुद्धा आम्ही चोप देवू ,वेळ प्रसंगी कायदा हातात घेऊ तरी अवैध दारू येत्या पाच दिवसात बंद न झाल्यास आम्ही दसरखेड एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन समोर दि.१९ जून २६ रोजी पासून आमरण उपोषण सुरू करू व जोपर्यंत गावातील दारू व वरली मटका बंद होत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण सोडणार नाही असा पवित्रा महिलांनी घेतला असून या बाबतचे निवेदन एम.आय.डी.सी पोलीस निरीक्षक वारे यांना दि.१३ जुन २६ रोजी देण्यात आले आहे या निवेदनावर सविताबाई धांडे, बेबाबाई सांगळकर, यमुनाबाई वाडसे, सरलाबाई हिवाळे, रेखाबाई वाडसे, ललिताबाई सांगळकर, दिपाली खवले, राधाबाई सांगळकर सह महिलांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# बोरिवलीतून एसी लोकलची संख्या वाढवा, आमदार उपाध्यायांची रेल्वेमंत्र्यांकडे मागणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मुंबईतील बोरीवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय उपाध्याय यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून बोरीवली रेल्वे स्थानकाच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, बोरीवली स्थानक हे मुंबईतील सर्वाधिक वदर्ळीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक असून, येथे दररोज सुमारे ४.५ लाख प्रवासी ये-जा करतात. पंतप्रधान अमृत भारत योजनेअंतर्गत स्थानकाच्या आधुनिकीकरण व पुनर्बांधणीला मंजुरी मिळालेली असल्याने या कामाला गती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय, आमदार उपाध्याय यांनी स्वतंत्र पत्रांद्वारे पश्चिम रेल्वेशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मागण्या रेल्वेमंत्र्यांसमोर मांडल्या. यामध्ये बोरीवली ते चर्चगेटदरम्यान एसी लोकल गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी प्रमुख आहे. वाढत्या प्रवासीसंख्येचा विचार करता एसी लोकल सेवांचा विस्तार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, दहाणू रोड, विरार आणि बोरीवलीदरम्यान धावणाऱ्या मेमू सेवांच्या जागी नव्या लोकल गाड्या सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. मेमू गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता असून, त्यामध्ये जुने रॅक असल्याने प्रकाश कमी पडतो आणि पुरेशी हवा मिळत नाही. नवीन लोकलच्या धर्तीवर गाड्या सुरू केल्यास उपनगरीय प्रवाशांना अधिक सुविधा मिळतील. यासाठी एसी आणि नॉन-एसी डब्यांचा समावेश असलेल्या लोकल गाड्या सुरू करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# महाराष्ट्रातही स्मार्ट मीटरबाबत जनतेत चर्चा; तमिळनाडूतील निर्णयाचा संदर्भ देत प्रश्न उपस्थित

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**लोणार :** देशभरात वीज वितरण व्यवस्थेच्या आधुनिकीकरणासाठी स्मार्ट मीटर योजना राबविण्यात येत असताना, या योजनेबाबत विविध स्तरांवर चर्चा आणि मतमतांतरे सुरू आहेत. अलीकडेच तमिळनाडू सरकारने स्मार्ट मीटर प्रकल्पाबाबत घेतलेल्या निर्णयाची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात होत असून, त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटताना दिसत आहेत.

काही नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीपूर्वी ग्राहकांवरील संभाव्य आर्थिक परिणाम, बिलिंग पद्धतीतील बदल आणि तांत्रिक बाबी याबाबत अधिक स्पष्टता आवश्यक आहे. तसेच ग्राहक संघटना आणि नागरिकांमध्ये जनजागृती करून त्यांचे मत जाणून घेण्याची मागणीही होत आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या विविध पोस्टमध्ये तमिळनाडू सरकारच्या भूमिकेचा संदर्भ देत महाराष्ट्र सरकारनेही स्मार्ट मीटर योजनेचा फेरविचार करावा, अशी मागणी काही नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, या संदर्भातील अधिकृत धोरणात्मक निर्णय राज्य शासन आणि संबंधित वीज वितरण कंपन्यांच्या अखत्यारीत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**टीप : स्मार्ट मीटर योजनेबाबत शासन व वीज वितरण कंपन्यांची अधिकृत भूमिका तसेच नागरिकांची मते या दोन्ही बाजूंचा विचार करून ही बातमी तयार करण्यात आली आहे.**

दरम्यान, महावितरण आणि केंद्र सरकारकडून स्मार्ट मीटरमुळे वीज वापराचे अचूक मोजमाप, पारदर्शकता, तांत्रिक तोटा कमी होणे आणि ग्राहकांना वापरावर अधिक नियंत्रण मिळणे यासारखे फायदे अधोरेखित करण्यात येत आहेत. दुसरीकडे, काही ग्राहक संघटना आणि नागरिकांनी योजनेच्या अंमलबजावणीबाबत अधिक माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.

यामुळे स्मार्ट मीटरचा विषय हा केवळ तांत्रिक नसून ग्राहक हित, पारदर्शकता आणि लोकसहभाग यांच्याशी संबंधित मुद्दा बनला आहे. शासनाने जनतेच्या शंका दूर करून सर्व संबंधित घटकांशी संवाद साधावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# नगरसेवकाच्या व्हायरल ऑडिओ प्रकरणी गुन्हा दाखल : राजकीय व सामाजिक चर्चांना उधाण

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापुर :** मलकापुर शहरातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले असून पक्षाचे नगरसेवक शेख इमरान शेख गुलाब याच्याविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १९६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, १३ जून रोजी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका ऑडिओ क्लिपमध्ये करण्यात आलेल्या वक्तव्यामुळे दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत पोलीस कर्मचारी मनोजकुमार उमाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दरम्यान, मलकापूर शहरात तीव्र पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नागरिकांकडून नियमित पाणीपुरवठ्याच्या मागणीसाठी निवेदने, मोर्चे व आंदोलने करण्यात येत आहेत. अशा परिस्थितीत शहराच्या विस्तारित भागात नव्या पाईपलाईनचे काम सुरू असल्याने काही नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर विविध सामाजिक माध्यमांवर शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावरून जनआंदोलनाचे आवाहन करण्यात आले होते. त्यानंतर संबंधित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने वातावरण अधिक तापले असून या प्रकरणाला जातीय रंग मिळू नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. सध्या शहरातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती पोलीस विभागाने दिली आहे. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावरून नागरिकांमध्ये तीव्र भावना व्यक्त होत असल्या तरी शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिलासा; राज्य शासनाकडून १४ कोटी ५८ लाखांचा निधी मंजूर

## बुलढाणा जिल्ह्यासाठी २ कोटी २७ लाखांचा भरीव निधी मंजूर
## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांची माहिती

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**बुलढाणा :** राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये माहे एप्रिल २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याकरिता राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, एकूण १४ कोटी ५८ लाख ९० हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मदत वाटप प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने होणार असून, मदतीचे वाटप थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात होणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

नुकताच निर्गमित झालेल्या अधिकृत शासन निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यात एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे २ हजार २२० बाधित शेतकऱ्यांना (१,३३५ हेक्टर) २ कोटी २७ लाख ३२ हजार रुपये निधी मंजूर केला असल्याची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

थेट बँक खात्यात निधी जमा (DBT): निश्र्चित केलेल्या दरांप्रमाणे सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना मदत निधी थेट त्यांच्या बँक खात्यात 'डीबीटी' (DBT) पोर्टलद्वारे वितरित केला जाणार आहे. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना संगणकीय प्रणालीवर सर्व लाभार्थ्यांची माहिती काळजीपूर्वक भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दुबार वाटप रोखणार: चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वितरित केलेल्या निधीमध्ये या नव्या प्रस्तावातील मागणीचा समावेश नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एका हंगामात एक वेळच याप्रमाणे मदत दिली जाईल. तसेच कोणत्याही लाभार्थ्याला दुबार मदत मिळणार नाही (द्विरुक्ती होणार नाही), याची संपूर्ण जबाबदारी संबंधित तहसीलदार व जिल्हाधिकारी कार्यालयावर सोपवण्यात आली आहे.

बँकांना वसुली करण्यास मनाई: नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मिळालेला हा मदतीचा निधी बँकांनी कोणत्याही जुन्या कर्ज खात्यात अथवा इतर कोणत्याही कारणास्तव वसुलीसाठी वळत करू नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

# राज्याच्या विकासात 'स्टँडर्ड चार्टर्ड' बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री

## बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक




उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

**जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना**

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच आठ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने सात लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

**रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना**

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

**आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी**

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या 'सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत चार लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्र्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्र्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

## Short न्यूज

### अंगावर तर्री पडली म्हणून तरुणाचा चाकूने खून, मारेकऱ्यांमध्ये तीन महिला

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**नागपूर :** नाश्त्याच्या दुकानात तर्री अंगावर पडल्याच्या किरकोळ कारणावरून सुरू झालेला वादाचे पर्यवसन खूनात झाले. कळमना पोलीस हद्दीतील भरतवाडा येथे सकाळी अकराच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे खून प्रकरणात पोलिसांनी अटक केलेल्या सात जणांमध्ये तीन महिलांचा देखील समावेश आहे. योगेश बीरसिंग शाहू (२८, रा. भगत नगर) असे किरकोळ कारणावरून धारदार शस्त्राने भोसकून खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजा , रोहित आणि योगेश शाहू हे तिघेही कामगार आहेत. रविवारी सकाळी ९ वाजता तिघेही कामावर गेले होते. सकाळी १०.३० वाजता काम आटोपून ते भरतगनर मार्गावरील अंकित नाश्ता सेंटरवर थांबले. दरम्यान नाश्ता करत असताना योगेश शाहूकडून तर्री आणि पाण्याचे शिंतोडे शेजारी उभ्या एकाच्या अंगावर पडले. यावरून दोघांमध्ये कडाक्याचे भांडण सुरू झाले.

यावरून दोघांत वाद वाद वाढत असल्याचे पाहून हॉटेलमालकाने दोघांनाही दुकानाबाहेर काढले. ते सर्व जण वाद घालत घालत शिवानी पिलारे हिच्याघरासमोर पोहचले. दरम्यान दोघेही जोरात ओरडत होते. त्यामुळे शिवानीने त्यांना घरासमोरुन निघून जाण्यास सांगितले.

त्यामुळे संतापलेल्या योगेशने शिवानीला शिविगाळ सुरू केली. त्यामुळे तिती आई सरिता पिलारे ही घराबाहेर आली. तिने योगेशच्या कानशिलात लगावली. त्यानंतर राजेश पिलारे, प्रफुल बांते आणि शुभांगी बांते या सर्वांनी योगेशसह तिघांनाही मारहाण सुरु केली. तेवढ्यात मुख्य आरोपी शुभम पिलारे तेथे आला. त्याने घरातून चाकू आणला आणि योगेशवर हल्ला केला. योगेश रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर राजा आणि रोहित यांनी योगेशला रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी योगेशला मृत घोषित केले. या प्रकरणी कळमना पोलिसांनी सात आरोपींवर हत्याकांडाचा गुन्हा दाखल करत सर्वांना अटक केली.

### आंबोली घाटात मोठे दगड कोसळले; सुदैवाने अनर्थ टळला

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सावंतवाडी :** आंबोली घाटात आज सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास मुख्य धबधब्यापासून सावंतवाडीच्या दिशेने काही अंतरावर असलेल्या ठिकाणी सुमारे ५० मीटर उंच कड्यावरून दोन भलेमोठे दगड घरंगळत रस्त्यावर आले. यातील एक मोठा दगड संरक्षक कठडा व रेलिंग तोडून हजारो फूट खोल दरीत कोसळला, तर दुसरा दगड रस्त्यावरच अडकून राहिला.सुदैवाने दगड कोसळण्याच्या वेळी त्या ठिकाणी कोणतेही वाहन किंवा पर्यटक नसल्याने मोठा अनर्थ टळला. अद्याप पावसाळी पर्यटन हंगाम पूर्णपणे सुरू झालेला नसल्याने तसेच रविवार असूनही गर्दी कमी असल्यामुळे संभाव्य जीवितहानी टळली.घटनेची माहिती वाहनचालकांनी आंबोली पोलीसांना दिल्यानंतर आंबोली पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संतोष गलोली, लक्ष्मण जाडे, गौरव परब आणि सचिन चव्हाण तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तसेच सावंतवाडी येथून पोलीस निरीक्षक अमोल चव्हाण यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्यानंतर जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावर अडकलेला दगड हटविण्यात आला आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली.

### १२ तासांत दोन हत्याकांड; आरोपींना सहा तासांत शिताफीने पकडले, अल्पवयीन मुलासह चार जण

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**अकोला :** १२ तासांत दोन हत्याकांडाने जिल्हा चांगलाच हादरला आहे. पूर्ववैमनस्यातून एका तरुणाची निर्घृण हत्या केल्याची घटना शहरातील तारफैल भागात शनिवारी रात्री ११.४५ वाजताच्या सुमारास घडली. अंकित धम्मपाल नंदागवळी (वय २९, रा. अकोट फैल, अकोला) असे मृतकाचे नाव आहे. दुसऱ्या घटनेत पातूर तालुक्यातील आलेगाव येथे १७ वर्षीय तरुणाची हत्या केल्याची घटना रविवारी घडली. यश गजानन गिऱ्हे असे मृतक तरुणाचे नाव आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी आरोपींना शिताफीने पडकले.

शहरात तारफैल भागात शनिवारी रात्री मुख्य आरोपी आनंद चवरे याने मृतक अंकित नंदागवळी याला कौटुंबिक वाद मिटवण्याचे कारण सांगून बोलावले. तरुण दाखल होताच त्याच्यावर दोन ते तीन जणांनी चाकूने समासप वार केले. या गंभीर हल्ल्यात अंकित रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला. घटनास्थळावरच तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, रामदास पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळावर धाव घेतली.

## पाणी प्रश्नासाठी उद्याच्या जनआंदोलनात सहभागी व्हा - ओम शिंदे यांचे आवाहन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** शहरात निर्माण झालेल्या भीषण पाणी टंचाईच्या प्रश्नावर आता नागरिकांचा संताप अनावर झाला असून, नगर परिषदेच्या कारभाराविरोधात दि. १६ जून रोजी जनआंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लि.भो. चांडक विद्यालय येथून सकाळी १० वाजता निघणाऱ्या या मोर्चात शहरातील मात-भगिनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते ओम शिंदे यांनी केले आहे.

शहरातील पाणी समस्येबाबत दि. १२ जून रोजी चांडक विद्यालय येथे नागरिकांची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत उपस्थित नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून यावर ठोस उपाययोजना व्हावी, यासाठी आंदोलन करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. यासाठी आंदोलन काळात सर्व व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेऊन पाणी प्रश्नासाठी करण्यात येणाऱ्या या आंदोलनात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

नगर परिषदेमार्फत धुपेश्र्वर येथील पूर्णा नदी पात्रातून शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र गेल्या काही महिन्यांपासून, विशेषतः मार्च ते मे या कालावधीत नागरिकांना १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याने महिन्यातून अवघ्या दोन वेळाच पिण्याचे पाणी मिळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर समस्येबाबत सर्वच लोकप्रतिनिधींनी भागृहात केवळ ठराव घेण्या व्यतिरिक्त कोणतीही ठोस भूमिका घेतली नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते ओम शिंदे यांनी जनआंदोलनाचा इशारा देत नागरिकांना एकत्र येण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार दि. १६ जून रोजी नगर परिषद प्रशासनाविरोधात होणाऱ्या आंदोलनाला शहरातील विविध घटकांसह सर्वसामान्य नागरिकांनी पाठिंबा दर्शविला असून, मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पूर्ववैमनस्यातून तरुणाची निर्घृण हत्या

### अकोल्यात मध्यरात्री रक्तरंजित थरार; कौटुंबिक वाद व अनैतिक संबंधाची किनार

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**अकोला :** पूर्ववैमनस्यातून एका तरुणाची दोन ते तीन जणांनी चाकूने भोसकून निर्घृण हत्या केल्याची घटना शहरातील तारफैल भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात शनिवारी रात्री ११.४५ वाजताच्या सुमारास घडली. अंकित धम्मपाल नंदागवळी (वय २९, रा. अकोट फैल, अकोला) असे मृतकाचे नाव आहे. या हत्याकांडामागे कौटुंबिक वाद असून अनैतिक संबंधाची किनार असल्याचा संशय देखील पोलिसांनी व्यक्त केला. आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत.

शहरातील रामदास पेठ पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या तारफैल भागात शनिवारी रात्री ११.४५ वाजताच्या सुमारास अंकित याच्यावर दोन ते तीन जणांनी चाकूने समासप वार केले. या गंभीर हल्लयात अंकित रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला. घटनास्थळावरच तरुणाचा मृत्यू झाला. पूर्ववैमनस्यातून हा हल्ला करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी पोलिसांना दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, रामदास पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळावर धाव घेतली. घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात आला.

आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना

हत्येच्या घटनेनंतर आरोपी फरार झाले. त्यांचा शोध घेण्यासाठी रामदास पेठ पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेचे विविध पथके रवाना झाली आहेत. परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी करून आरोपींची ओळख पटविण्यात येत आहे. या घटनेत दोन ते तीन आरोपी असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली. आरोपींचा कसून शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरात चांगलीच खळबळ उडाली असून दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

पोलिसांना मिळलेल्या प्राथमिक माहितीनुसार, तरुणाच्या हत्या प्रकरणातील आरोपी त्याचे नातेवाईक व संबंधित असल्याची माहिती आहे. त्यांच्यात जुना वाद सुरू होता. काही कौटुंबिक वाद असून अनैतिक संबंधाचा प्रकार असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणात दोन ते तीन आरोपी असून त्यांचा शोध घेतला जात असल्याची माहिती रामदास पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांनी दिली. दरम्यान, हत्येच्या घटनेमुळे शहर हादरले असून आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याचे आव्हान पोलिसांपुढे आहे.

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार शेतकऱ्यांसाठी वरदान : मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** पर्यावरण वाचवणे आणि भूजल पातळी टिकवण्यासाठी पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरवणे हीच आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून भूगर्भात मुरवणे आणि वाहून जाणारी माती थांबवणे ही गरज ओळखून 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या मोहिमेत प्रत्येक नागरिकाने राज्य शासनासोबत एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

मृद व जलसंधारण विभाग गेल्या काही वर्षांपासून राज्यभर भरीव काम करीत आहे. सध्या आम्ही 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेतली असल्याची माहिती मंत्री श्री.राठोड यांनी दिली.

मंत्री श्री.राठोड म्हणाले की,





राज्यातील तलावांमध्ये, बंधारे व धरणांमध्ये गेल्या काही वर्षांपासून भरपूर गाळ साचला आहे. हा गाळ म्हणजे शेतकऱ्यांसाठी सोनं आहे. ते नैसर्गिक कंपोस्ट खत आहे. जर आपण धरणातील हा गाळ काढून शेतात टाकला, तर दोन फायदे होतात. धरणातील गाळ निघाल्यामुळे धरणात अधिक पाणी साठा निर्माण होईल आणि तो अधिक दिवस टिकेल. तर हा गाळ शेतात टाकल्याने जमिनीची सुपीकता वाढून उत्पादन वाढेल आणि शेतकरी सुखी होईल.

छोटे-छोटे बंधारे बांधणे, नाल्यांचे खोलीकरण-रुंदीकरण करणे, पावसाचे पाणी अडवणे ही कामे आज राज्यभर सुरू आहेत. पण हे काम फक्त शासनाचे नाही, या कामात समाजाचेही योगदान महत्त्वाचे आहे. प्रत्येक गावाने, प्रत्येक शेतकऱ्याने या मोहिमेत सहभाग घ्यावा. आपण जर आज पाणी अडवले, माती अडवली, तर उद्याची पिढी आपल्याला धन्यवाद देईल. पर्यावरण वाचवायचे असेल, शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद आणायचा असेल, तर जलसंधारणाशिवाय पर्याय नाही, असे ही मंत्री श्री. राठोड यांनी सांगितले.

## विकसित भारत युवा संसद २०२६ : पुण्याचा चैतन्य गर्जे महाराष्ट्राचे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणार

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**पुणे :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या अधिपत्याखालील स्वायत्त संस्था मेरा युवा भारत मार्फत 'विकसित भारत युवा संसद २०२६' चे आयोजन

नवी दिल्ली येथे १५ ते १७ जून २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा तसेच कामगार व रोजगार मंत्री मा. डॉ. मनसुख मांडविया यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. देशभरात तीन टप्प्यांमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेच्या जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय फेऱ्यांनंतर राष्ट्रीय फेरीसाठी राज्यनिहाय उत्कृष्ट युवा प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती पुण्याचे जिल्हा युवा अधिकारी आशिष शेटे यांनी दिली.

## डॉक्टर होण्याचे स्वप्न; तणावातून वडिलांसमोरच धरणात उडी, मुलाला वाचवताना वडिलांचाही पाय मोडला

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**अकोला :** डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याने वडिलांसमोरच धरणात उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची हृदयद्रावक घटना वाशीम जिल्ह्यात शनिवारी सायंकाळी घडली. मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडिलांचा देखील पाय मोडला आहे.


वाशीम जिल्ह्यातच दुसऱ्या एका घटनेत धरणात बुडून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. एकाच दिवशी दोन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

कारंजा ते मानोरा मार्गावरील अडाण धरणाच्या पुलावरून जात असतांना विद्यार्थ्याने अचानक उडी मारली. कारंजा तालुक्यातील कुपटी येथील रहिवासी २२ वर्षीय संचित सुभाष मुंदे हा अत्यंत हुशार आणि होतकरू तरुण होता. वैद्यकीय शिक्षण घेण्याच्या तो तयारीत होता. आपल्या वडिलांसोबत पुलावरून जात असतांना काही समजण्याच्या आतच संचितने अचानक धरणाच्या पात्रात उडी घेतली. डोळ्यांदेखत मुलाने धरणात उडी मारल्याचे पाहून वडिलांच्या पायाखालची वाळूच सरकली.

मुलाला वाचवण्यासाठी ते धरणाच्या पात्राकडे धावले. उतारावर त्यांचा पाय मुरगळला. त्यामध्ये त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला. डोळ्यांसमोर आपला तरुण मुलगा पाण्यात दिसेनासा होताना पाहून त्या हताश पित्याने टाहो फोडला. या घटनेची माहिती कारंजा तहसीलदार रवी महाले तसेच मानोरा तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशनद्वारे संचालित संतगाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख दीपक सदाफळे यांना दिली. आपल्या सहकाऱ्यासह त्यांनी घटनास्थळावर धाव घेऊन २० ते २५ फ ूट खोल पाण्यात शोध मोहीम राबवली. मृतदेह शोधून बाहेर काढण्यात आला.

**धरणात पोहणे जीवावर बेतले**

दुसऱ्या घटनेत यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील रहिवासी १८ वर्षीय अंश विजय जयस्वाल हा आपल्या चार मि त्रांसह मानोरा तालुक्यातील फुलउंबरी येथील धरणात पोहण्यासाठी गेला होता. खोल पाणी आणि तळाशी असलेल्या गाळाचा अंदाज आला नाही. त्यामुळे तो पाण्यात बुडाला. या घटनेची माहिती मिळताच मानोराचे तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी तातडीने संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाला मदतीसाठी पाचारण केले. पथक प्रमुख दीपक सदाफळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी



घटनास्थळावर धाव घेतली. पथकाने मृतदेह शोधून बाहेर काढला. या दोन्ही घटनांमध्ये परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.